| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७९ वा | बुधवार दिनांक २१ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रकाश रा.आरळी खु, ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१९.०१.२०२६ रोजी आरळी खुर्द मध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ डॉयरेक्टर पान मसाला, शॉट तंबाखु, केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही १ तंबाखुचे असा एकुण १२,०३० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम-, २२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, शेख अमीर शेख खैरुद्दीन, रा. नेकनुर ता. जि. बीड यांनी दि. १८.०१.२०२६ रोजी पारगाव टोल नाका येथे आयशर टॅम्पो क्र एमएच २३ डब्ल्यु ११३७ मध्ये गोवंशीय जातीचे ११ जर्सीगायी एक पांढरे रंगाचा बैल व एक वासरु एकुण ३,७०,००० किंमतीची गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना वाशी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(अ), ११(१)(एच), ११(१)(एफ), ११(१)(आय) सह कलम ४७, ५४, ५६ प्राण्याचे परिवहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### संक्रांतीच्या सणानिमीत्त गावाकडे गेले असता सोन्याचांदीचे दागिणे व रोख रकमेकची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- सदाशिव त्रिंबक जाधव, वय ५७ वर्षे, रा. पोस्ट कॉलनी धाराशिव ता. जि. धाराशिव हे व त्यांचे पत्नी असे मकर संक्रांतीच्या सणानिमीत्त गावी गेले असता त्यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. १३.०१.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे, चांदीचे दागिने व रोख रक्कम १५,००० असा एकुण ६१,१०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- सदाशिव जाधव यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## 'स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान २०

## ग्रामसभा, शाळा व महाविद्यालयातून व्यापक प्रमाणात जनजागृती करा-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार



धाराशिव (जिमाका)जिल्ह्यात-गावपातळीवर आयोजित ग्रामसभेतून तसेच शाळा - महाविद्यालयातून जिल्हा कुष्ठरोग मुक्त करण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करा.असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२६ प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कृती प्रभावीपणे अंमलात आणण्याबाबत जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.स्पर्श कुष्ठरोग जनजागृती मोहिम २०२६ चे घोषवाक्य भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया हे आहे.२६ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यात होणाऱ्या ग्रामसभांमध्ये आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन,जिल्हाधिकारी यांचे आवाहन वाचन,सरपंच / ग्रामप्रमुख यांचे कुष्ठरोगाविषयी भाषण,सपना संदेश वाचन (हा संदेश शाळकरी मुलीमार्फत दिला जाणार असून तिला 'सपना' हे नाव देण्यात आले आहे),कुष्ठरोग प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.रोगमुक्त कुष्ठरुग्ण उपलब्ध असल्यास त्याचा सत्कार करून योग्य उपचाराने कुष्ठरोग बरा होतो याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तसेच दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी ध्वजारोहणानंतर सर्व शासकीय कार्यालये,आरोग्य संस्था, शाळा व महाविद्यालये येथे जिल्हाधिकारी यांचे आवाहन वाचन करून कुष्ठरोगाबाबत प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.३० जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुण्यतिथी दिन कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोग निवारण पंधरवडा राबविण्यात येणार असून, या पंधरवड्यात पुढीलप्रमाणे आरोग्य शिक्षण कार्यक्रम राबविले जाणार आहेत. शाळांमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग प्रतिज्ञेचे वाचन करण्यात येणार आहे.

शाळेतील सूचना फलकावर कुष्ठरोगाबाबतचे संदेश लिहिण्यात येणार आहेत.शाळांमध्ये पथनाट्य, प्रश्नमंजुषा स्पर्धा,निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी,कविवाचन, रांगोळी स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांची प्रभातफेरी आयोजित करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाचे लवकर निदान व वेळेवर उपचाराचे महत्त्व तसेच कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करण्याबाबत प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. स्थानिक महिला मंडळे,बचत गट व तरुण मंडळांच्या सभा आयोजित करण्यात येणार आहेत.खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.शाश्वत विकास ध्येयांतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे.तथापि,नियमित व विशेष सर्वेक्षणांमध्ये काही उपेक्षित, वंचित किंवा दुर्लक्षित गटातील व्यक्ती तपासणीपासून वंचित राहतात.

या पार्श्वभूमीवर दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठरोगमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.या कार्यक्रमांतर्गत पुढील तपासण्या करण्यात येणार आहेत.विटभट्टी कामगारांची तपासणी,खडी केंद्रांवरील कामगारांची तपासणी, साखर/गूळ पावडर कारखाना कामगार व ऊसतोड मजुरांची तपासणी,आश्रमशाळा व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांची तपासणी, बांधकाम साईटवरील कामगारांची तपासणी,जेलमधील कैद्यांची तपासणी,स्थलांतरित लोकांची तपासणी इत्यादी.

या बैठकीची प्रस्तावना डॉ.एम. आर. कोरे, सचिव,जिल्हा समन्वय समिती तथा सहाय्यक संचालक,आरोग्य सेवा (कुष्ठरोग), धाराशिव यांनी केली.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा समन्वय समिती श्री.पुजार यांनी जिल्ह्यात प्रभावीपणे कुष्ठरोग जनजागृती राबविण्यासाठी सर्व विभागांनी सहकार्य करावे,असे आवाहन केले.तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी शाळा व महाविद्यालयातून अधिकाधिक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीस सर्व सदस्य उपस्थित होते.अभियान यशस्वी करण्यासाठी कार्यक्षेत्रात आवश्यक सूचना दिल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर यांनी सांगितले.

अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी गावनिहाय पथके तयार करून सर्व ग्रामसभांच्या ठिकाणी एक आरोग्य कर्मचारी किंवा आशा कार्यकर्ती उपस्थित राहणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास यांनी दिली.

## श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे विचार विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबवा-आरडीसी विद्याचरण कडवकर



धाराशिव (जिमाका)- हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांनी आपल्या विचारातून,वाणीतून आणि सर्वोच्च बलिदानातून मानवी समानतेचा संदेश दिला आहे.त्यांच्या ३५० व्या बलिदान पर्वानिमित्त त्यांच्या महान कार्याचे स्मरण करण्यासाठी जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात यावे.असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहीदि समागम वर्षानिमित्त जिल्ह्यात आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने आढावा बैठकीत श्री.कडवकर बोलत होते.यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.मापारी,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, एमआयडीसीचे क्षेत्रीय अधिकारी पी.एम.पारधे,विद्यापीठ उपकेंद्राचे प्रा.रमेश चौगुले,अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. लाकाळ,संतोष अडवाणी,प्रदीप रोहीडा,संजय आडवाणी,विस्तार अधिकारी (शिक्षण ) श्रीमती.मैदर्गी,तहसीलदार (महसूल) श्री.प्रकाश व्हटकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

श्री.कडवकर म्हणाले की,जिल्ह्यातील विविध शाळा,माध्यमिक शाळा व महाविद्यालयांनी गावात प्रभात फेरी काढून हिंद दी चादर यांचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी विविध घोषणा देऊन कार्यक्रमाचे आयोजन करावे.विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व,निबंध व चित्रकला स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात यावे.या सर्व स्पर्धांमधून गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या विचारांचा जागर करण्यात यावा.असे श्री.कडवकर यांनी सांगितले.

जिल्ह्यात असलेले सिख,सिकलकर, बंजारा,लबाना,सिंधी,मोहियाल, वाल्मिकी,उदासीन व भगत नामदेव (वारकरी) या संप्रदाय व समाजातील लोकांशी संपर्क करून नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमाला जे येण्यास इच्छुक आहे त्यांची यादी गाव पातळीवर ग्रामसेवकांनी तयार करून गटविकास अधिकाऱ्यांमार्फत त्यांना या कार्यक्रमाला नांदेड येथे घेऊन जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात यावी. नांदेड येथील कार्यक्रमासाठी सेवाभावी वृत्तीने नागरिकांनी लंगरसाठी साहित्य व वस्तु देऊन आपले योगदान द्यावे.

तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींनी यासाठी पुढाकार घ्यावा.असे श्री कडवकर यावेळी म्हणाले.

## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ : शाळा, टोल नाका व महामार्गावर विविध उपक्रम




धाराशिव (जिमाका) रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत जिल्ह्यात विविध ठिकाणी रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या.

शाळेत विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन १३ जानेवारी रोजी श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय,धाराशिव येथे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत मोटार वाहन निरीक्षक श्री.सचिन बंग व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.शिवाजी बहीर यांनी शालेय विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी Walk on Right नियम, हेल्मेट व सीट बेल्टचे महत्त्व,वेग मर्यादेचे पालन,मद्यपान करून वाहन न चालविणे तसेच विविध रस्ता चिन्हांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. रस्त्यावर अपघात झाल्यास अपघातग्रस्त व्यक्तींना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा विषयक प्रश्नमंजुषा घेण्यात येऊन पारितोषिकांचे वितरण करण्यात आले आणि माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले.

**तामलवाडी टोल नाक्यावर मोफत आरोग्य शिबीर**

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत धाराशिव-सोलापूर महामार्गावरील तामलवाडी टोल नाका येथे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात मोटार वाहन निरीक्षक श्री. सुनील शिंदे,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.विशाल भगरे,सहायक पोलिस निरीक्षक गोकूळ ठाकूर, वाहतूक पोलीस कर्मचारी,IRB चे सावंत,तामलवाडी टोलनाक्यावरील सर्व कर्मचारी व डॉक्टर उपस्थित होते.

**अपघातप्रवण 'ब्लॅक स्पॉट'ची पाहणी व उपाययोजना**

१४ जानेवारी रोजी सोलापूर -तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांना आळा घालण्यासाठी परिवहन विभाग,महामार्ग पोलीस, स्थानिक पोलीस व तामलवाडी टोल नाका प्रशासनाच्या वतीने अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट) पाहणी करण्यात आली.

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते माळुंब्रा दरम्यान सातत्याने अपघात घडत असल्याने या परिसराची सखोल पाहणी मोटार वाहन निरीक्षक श्री.सुनील शिंदे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री. विशाल भगरे, खठइ चे सुपरवायझर श्री.ज्योतिलिंग सावंत, श्री.पी.डी. शाहू व श्री.नितीन भोसले यांनी केली.

यावेळी सुरतगाव,वडगाव-काटी, सांगवी-काटी, मुक्तीनगर, गोंधळवाडी पाटी,कदमवाडी या 'डेंजर झोन' ठिकाणांची पाहणी करून आवश्यक उपाययोजनांबाबत टोल नाका प्रशासनाला निर्देश देण्यात आले. तसेच मोटार वाहन निरीक्षक श्री.सुनील शिंदे यांनी सांगवी गावातील ग्रामस्थांशी संवाद साधून सभेमध्ये रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले.

## धाराशिवमध्ये निवडणुकीचा रणसंग्राम! ओमराजे निंबाळकरांची यंत्रणा सज्ज, कैलासदादांचा खांद्याला खांदा- 'कामगिरी असेल तरच उमेदवारी'चा ठाम इशारा



धाराशिव (रामेश्वर डोंगरे )जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. खासदार ओमराजे निंबाळकर यांनी संपूर्ण यंत्रणा सज्ज केल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक गण, प्रत्येक गटात काटेकोर नियोजन सुरू असून निवडणूक व्यवस्थापनापासून उमेदवार निवडीपर्यंत सर्वच पातळ्यांवर तयारीला धार दिली जात आहे.

या रणधुमाळीत आमदार कैलासदादा पाटील हे खांद्याला खांदा लावून मैदानात उतरले आहेत. उमेदवारी निवड असो वा गण-गटनिहाय रणनीती-प्रत्येक निर्णय कसोटीवरूनच घेतला जाणार, असा स्पष्ट संदेश नेत्यांकडून दिला जात आहे. उमेदवाराचे चरित्र, कामगिरी, सामाजिक योगदान आणि जनसंपर्क या मुद्द्यांवर कसोटी लावली जाईल; केवळ राजकीय वलय किंवा ओळखीवर उमेदवारी मिळणार नाही, हेही ठामपणे सांगण्यात येत आहे.

विशेष म्हणजे युवा उमेदवारांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय निर्णायक ठरत आहे. ऊर्जावान, काम करणारा आणि जनतेशी नाळ जुळवणारा युवा चेहरा- हाच यंदाचा निकष असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. उबाठा गटाकडूनही हीच भूमिका अधोरेखित होत असून उद्धव बाळासाहेब ठाकरे गट फक्त काम करणाऱ्या व्यक्तीलाच उमेदवारी देणार हे



गणित जवळपास पक्के मानले जात आहे.

एकूणच धाराशिवमध्ये निवडणूक केवळ संख्याबळावर नाही, तर कामगिरीच्या जोरावर जिंकण्याची तयारी सुरू आहे. उमेदवारीच्या कसोटीवर जो उतरला, तोच मैदानात-असा ठाम संदेश देत राजकीय समीकरणे वेगाने आकार घेत असल्याचे स्पष्ट जाणवत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## निवडणुका म्हटले की, यश-अपयश आलेच......

महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर जिल्हापरिषद व पंचायतसमितीची निवडणुक प्रक्रिय सुरू झाली. नुकत्याच पार पडलेल्या नगर व महानगरपालिकेत भाजपाला मोठे यश आले. यावरून एक बाब समोर येते ती म्हणजे, निवडणुका म्हटल्या की, यश-अपयश आलेच! शर्यतीत एकाचा विजय होत असतो. त्यालाच यशस्वी खेलाडी म्हणून घोषीत केले जाते. तसे निवडणुकीत एकाजनच विजयी होतो बाकी हरलेले असतात. पराभव झालेल्यांनी उमेद ठेवून कामाला लागले पाहिजे. सध्याला महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाला जसे यश आले तसे मनी-ध्यानी नसताना एमआयएमला आले आहे. पुर्वी संभाजीनगरमध्ये यश मिळाले होते. नंतरच्या काळात मिळाले नाही. जनतेनी मताचा कौल दिला. वास्तविक जनतेच्या विचाराशी समरस व्हावे लागते. एकदा निवडूण आले की, पुन्हा वार्डात फिरायाचे नाही. असेच होते. लातूरमध्ये घ्या, दररोज मतमागण्यासाठी दिवसातून तीनवेळा येणारे उमेदवार निवडूण आले की, भेटायाला किंवा आभार मानायाला फिरल्याचे दिसले नाहीत. काही बोटावर मोजण्याइतकी मंडळी दिसून आली, नव्वद टक्के निवडूण आलेले आपले प्रतिनिधी साडेचार वर्ष कसे वागतात हे दिसून येणारच आहे. आतच तोऱ्यात दिसून येत आहेत हे योग्य नाही. ज्यावेळी सेवक म्हणून निवडणुक लढविली, त्यानंतर नम्रता आवश्यक असते. ती आता उरली नाही. सध्याच्या निवडणुकीचे स्वरूप पाहिले तर जनतेला मजबुत असा पर्याय नाही. एकच पर्याय असल्याने एकाच पक्षाला भरभरून यश मिळत आहे. बाकीच्यांना नाही असे नाही. इतर काय करत आहेत तर निवडणुकीच्या तोंडावर निर्णय घेतात. लोकशाहीत एकाच्या हाती सर्व काही असणे योग्य नाही. विरोधक सुद्धा मजबुत असला पाहिजे. त्यामुळे विरोधकांची जबाबदारी आहे की, आपल्याला जनतेनी स्विकारले पाहिजे. असे काही करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामागील कोणती कारणे आहेत. याचा विचार केला पाहिजे. मुंबईत ठाकरे बंधुंना का मोठ्या प्रमाणात स्विकारले नाही. एमआयएमला चांगले यश का आले? कॉँग्रेसला मोठी हार का मानावी लागत आहे. पवार काका-पुतण्यापासून मतदार जनता दूर का जात आहेत, यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. असेच झाले तर लोकशाही मजबुत होणार आहे. भाजपा जे धोरण राबवित आहे याला जनतेची पसंती आहे हे उघड आहे. अशा काही योजना असतात की, त्याकडे जनता आकर्षिली जाते. महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकमेव अपवाद ही लातूरशहरमहानगरपालिका आहे की, येथे भावनिकमुद्दयावर निवडणुक झाली. इतर ठिकाणी काय घडले. सोलापूर, छत्रपतीसंभाजीनगर, पुणे, मुंबई आदि महानगरात कॉँग्रेसची स्थिती काय दर्शविते! त्यामुळे विचार करायाला लावणारी निवडणुक पार पडली. आगामी काळात सुद्धा जे महानगरात घडले तेच ग्रामीण भागात घडण्याची शक्यता आहे. परिवर्तन काय घडणार आहे? घडण्यासारखे विरोधकाकडे काय आहे? एकतर राष्ट्रीय नेत्यांनी सुत्रे हाती घेतल्यापासून कोणते यश मिळविता आले. राहूल गांधी यांनी कोणती राज्य कॉँग्रेसच्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविता आहे. प्रदेशाध्याने अशी कोणता धाडसी निर्णय घेवून कॉँग्रेसला सकारात्मक बाबी घडविल्या. कॉँग्रेसच्या प्रदेशाध्याने राज्यात काहीही परिवर्तन घडविले नाही. उलट वंचित असो किंवा एमआयएमने बाजी मारली आहे. राज्यात निवडूण येणारे कोण-कोण आहेत यावर नजर टाकली तर बरेच कळून येणार आहे. सर्वात विचार करावा लागेल तर शरद व अजित पवार यांना? कारण राजकिय भवितव्या बाबत प्रश्नचिन्ह दिसून येत आहे. शरद पवार यांच्या सारख्या जेष्ठांची राज्याला गरज आहे. त्यामुळे जनतेत विश्वास असणारा असा मजबुत पर्याय मिळेच असे सध्याला वाटत नाही. आज अनेक राज्य भाजपाच्या ताब्यात आहेत. अनेक ठिकाणी त्यांचे वर्चस्व आहे. अशा स्थितीत इतर कोणताही पक्ष भाजपा टक्कर देईल असे वाटत नाही. अनेक पक्षाची रणनिती बिघडत चालली आहे असेच दिसून येत आहे. भाजपाची रणनिती व इतररांची यात जो फरक दिसून येत आहे, यावर अभ्यासाची गरज आहे. सध्याला भाजपाला टक्कर देणारा पक्ष मजबुत स्थितीत दिसून येत नाही. भाजपामध्ये काही रविंद्र चव्हाणासारखी मंडळी आहे. त्यामुळे पक्षाची लोकप्रियता खुंटली जात आहे. ही बाब आता केंद्रिय पक्षश्रेष्ठींना कळली असेल. त्यामुळे सध्याला जी स्थिती दिसून येत आहे यावर विरोधकांनी विचार केला पाहिजे. भाजपाला यश मिळाले म्हणून भाजपाने जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आता तर अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. नियोजन करावे लागणार आहे. ज्या समस्या आहेत. निवडणुक काळात जी आश्वासने दिली आहेत त्याची सोडवणुक करावी लागणार आहे. लोकप्रिय कार्यक्रम राबविला पाहिजे. भाजपाला आज मजबुत असा विरोधी पक्ष समोर नाही. कॉँग्रेस पुन्हा पुढील काळात उभारी घेईल का नाही हे सांगता येत नाही. कॉँग्रेस प्रदेशाध्याने सुत्र हाती घेतल्यापासून अशी कोणती बाजी मारली? मजबुत असे संघटन कार्य केल्याचे उघड दिसून येत नाही, ज्यापासून पक्षाला लाभ झाला. सोलापूरात आपल्याच पायावर दगड मारून घेतला आहे. जग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्त्युती करते. त्याच नेत्यास आपमानकारक प्रणीती यांनी बोलणे किती महागात पडू शकते हे आता कळून आले असेल. त्यामुळे तोंड सांभाळून बोलले पाहिजे. तोंड सांभाळून बोलले नाही तर काय घडू शकते याची याची प्रचिती अनेकांना आली आहे. त्यामुळे कोणताही पक्ष असो तो जनतेसोबत असला पाहिजे. हे या निवडणुकीवरून दिसून आले. त्याच प्रमाणे जनतेला पर्याय मिळाला तर जनता विचार करते. पर्यायच मिळू दिला नाही तर आपलीच चलती असते हे राजकियनेत्यांना कळून आले आहे. त्यामुळे राज्यात भाजपालाची ताकद यासाठी वाढती आहे. राज्यात मजबुत असा विरोधी कोणी दिसून येत नाही. कमकूवत असा विरोधीपक्ष असेल तर लोकशाही मजबुत राहू शकते का? त्यामुळे जो पर्यंत जनतेला मजबुत असा पर्याय मिळणार नाही तो पर्यंत सत्ताधाऱ्यांची पकड मजबुत असणार आहे. निवडणुक हार व जीत असते याला महत्त्व न देता आगामी काळात मजबुत कसे होता येईल याचा विचार पराजित पक्षप्रमुखांनी केला पाहिजे.

# भारतीय संस्कृतीचा गौरव- श्री गुरु तेगबहादुर साहिब

**‘हिंद दी चादर’, म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख....**




सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. ‘एकम सत् विप्रा बहुधा वदंती’ म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत. गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो.

### जन्म आणि पार्श्वभूमी

गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते ‘आनंदपूर साहिब’ म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत.

### साहित्य, उपदेश आणि आध्यात्म

गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम ‘सिमरन’ (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः ‘शबद’ किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मन-शरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो.

### संघर्षाचा कालखंड

गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला.

### सर्वोच्च बलिदान

गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. ‘जर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतःहून तुमचा धर्म स्वीकारू’, असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी काश्मिरी पंडितांना केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील ‘सीस गंज साहिब’ गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते. ‘जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेल’, असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. ‘सीस गंज साहिब’ गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो.

### मानवतेचा संदेश

शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.

**-रमाकांत दाणी,**
प्रसिद्धी समन्वयक,
संचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय,नागपूर.

# शुर योध्दा राय लखिशा बंजारा!

राय लखिशा बंजारा हे मध्ययुगीन भारतातील शूर, दानशूर आणि लोककल्याणासाठी समर्पित असे महान योद्धा होते. त्यांच्या जन्मापासून ते कार्यापर्यंतचा प्रवास हा पराक्रम, त्याग आणि मानवतेचा आदर्श ठरतो. आपले राष्ट्रपती भवन पूर्वाश्रमीचे लखिशा बंजारा यांची ही भूमी आहे. पंजाब मधील खैरपूर तालुका-अलीपूर जिल्हा-मुजफ्फरगड येथे ४ जुलै १५८० रोजी त्यांचा जन्म झाला. सध्या हे ठिकाण पाकिस्तान मध्ये आहे. वडील गोधु बंजारा वडतिया जाधव व्यवसायाने सिव्हील ठेकेदार होते. आजोबा ठाकूरदास बंजारा वडतिया जाधव योद्धा व कुशल व्यापारी होते. नागैया, हेमा, हरी,सितु,पांडरा,बक्षी, बाला, जवाहर ही मुले तर सितो नावाची मुलगी लखिशा बंजारा यांना होती. १७ नातू व २४ पणतू असा मोठा परिवार होता. १६०८ मध्ये गोराम पवार परिवारातील कांतोबाईसोबत विवाह झाला.

लखिशा बंजारा यांना ९९ वर्षे १० महिने एवढे आयुष्य लाभले. नवी दिल्ली येथे रायसिना, मालचा, बाराखांब आणि नरेला ही गावे त्यांनी वसविली आहेत व ८० तांड्याची मालकी होती. राजधानी दिल्लीच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली चार गावांची १२३३ एकर जमीन लखिशा बंजारा यांच्या नावाने महसूल रेकॉर्डवर होती, मथुरा वृंदावन जयसिंगपूर येथे आजही लखिशा बंजारा यांची सात एकर महसुली जमीन असून उदासीन आश्रम यांचे ताब्यात आहे. तेथे लेंगी व बंजारा होळी साजरी केली जाते. बुंदेलखंडमधील सागर परिसरात राय लखिशा बंजारा यांना लोकनायक म्हणून आदरार्थी ओळखले जाते. सागर तलाव लखिशा बंजारा यांच्या नावाने आजही ओळखला जातो. सागर तलावाजवळ लखिशा बंजारा यांचा पुतळा असून



परिसरात ऐतिहासिक स्थळे व मंदिरे आहेत. दानशूर लखिशा बंजारांनी लोककल्याणासाठी शेकडो तलाव बांधले, विहिरी खोदल्या व्यापारी मार्गावर १० किलोमीटर अंतरावर तांडा, मुक्कामासाठी धर्मशाळा बांधल्या. लखिशा यांनी निर्माण केलेल्या विहिरी आजही बंजारा बावडी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या दगडावर राय लखिशा बंजारा यांचे नाव कोरले असल्याचे आजही पहावयास मिळते. फारसी भाषेतील शहा व भारतीय भाषेतील राय या दोन्ही शब्दांचा अर्थ राजा असा होतो. बाबा बंदासिंह बहादूर यांनी लोहगड किल्ल्याची निर्मिती केली. किल्ला निर्माण कार्यात लखिशा बंजारा यांचे खूप मोठे योगदान राहिले होते. बांधकामासाठी लागणारे कारागीर, मजूर, दगड, चुना इत्यादी साहित्य त्यांनी पुरविले. हरियाणा मधील यमुनानगर जिल्हा आणि हिमाचल प्रदेशातील सिरमोर जिल्ह्यात लोहगड किल्ला ७ हजार एकर भूक्षेत्रात विस्तारला आहे. लोहगड किल्ला, लाल किल्ला, बंजारा विश्रामस्थल आणि गुरुद्वारा रकबगंज ही त्यांची ऐतिहासिक संस्मरणीय कृती याची साक्ष देत आहे.दिल्लीचा लाल किल्ला लखिशा बंजारा यांच्या २५५ एकर क्षेत्रात निर्माण केला गेला आहे. किल्ल्याला दक्षिण दिशेला लाहोर मुख्यद्वार, दुसरा मुख्यद्वार दिल्ली गेट आणि यमुना नदीकडे असलेला वॉटर गेट अशी रचना केलेली आहे. लखिशा बंजारा हे शूरवीर व दानशूर योद्धा होते. धर्म स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणारे शिखांचे नववे गुरू तेगबहादूर यांचे मृत शरीर मिळविण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावून त्यांचा अंतिम संस्कार रायसिना रकाबगंज दिल्ली येथे केला व रक्षा एका घटात भरुन जमिनीत पुरली. गुरू तेग बहादूरसिंह यांचे शिर भाई जेता बंजारा यांनी दि १६ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांचे पुत्र गोविंद राय यांना सुपूर्द केले व १७ नोव्हेंबर रोजी आनंदपूर साहिब येथे अंत्यसंस्कार करण्यात आला.जगातील ही एकमेव घटना आहे की, शरीर व शिर याचा अंत्यसंस्कार दोन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आला.१५ जानेवारी १७८३ रोजी लखिशा बंजारा वडतिया यांच्या घराची एक भिंत बांधकामासाठी पाया खोदणे सुरू होते तेंव्हा जमिनीत पुरून ठेवलेला घट निघाला. हे स्थळ आजच्या संसद भवन समोरच आहे. आता तेथे लखिशा बंजारा यांचे स्मरणार्थ भाई लखिशा बंजारा हॉल बांधण्यात आला आहे.रायसिना टेकडीच्या बाजूला मालचा तांड्यात लखिशा बंजारा यांनी दि २८ मे १६८० रोजी दिल्ली मालचा पॅलेस मध्ये अखेरचा श्वास घेतला. लखिशा बंजारा हे महान सेनानी आपले प्रेरणास्थान म्हणून सदैव संस्मरणीय राहील.

**अवि जी. चव्हाण**
**नांदेड. मो :- ९७६३२९१७७४**

## श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात पंचक्रोशीतील गावांचा सहभाग वाढविण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

**पंचक्रोशीतील गावांचा भव्य जनसहभाग;**
**नगर किर्तनातून सामाजिक ऐक्याचा संदेश**

**नांदेड प्रतिनिधी:** शिख पंथाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड शहर व पंचक्रोशीतील गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळावा, यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी आज लंगर साहिब गुरुद्वारा येथे भेट देऊन बाबा बलवंदरसिंग जी यांच्याशी चर्चा केली.

यावेळी बाबा बलवंदरसिंग यांनी नांदेड शहरासह पंचक्रोशीतील सर्व नागरिकांना आवाहन केले की, शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या भव्य नगर किर्तनात नागरिकांनी, महिला, युवक व बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

तसेच प्रत्येक गावातून किमान एक दिंडी भजन मंडळासह नगर किर्तनात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्म, मानवी हक्क व समाजहितासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरवशाली इतिहास समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगर किर्तनाच्या माध्यमातून त्याग, बलिदान व सामाजिक ऐक्याचा संदेश संपूर्ण देशभर पोहोचेल आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांना हीच खरी अभिवादन ठरेल, असे बाबा बलवंदरसिंग यांनी सांगितले.

## सेवा स्टॉलच्या माध्यमातून सेवेची सुवर्णसंधी - जिल्हाधिकारी राहुल कर्डिलेर

**हिंद दी चादर शहीदी समागमानिमित्त**
**सेवाभावी संस्था व नागरिकांना आवाहन**

**नांदेड प्रतिनिधी:** नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंद दी चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त भव्य विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून तसेच राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी शहरातील विविध ठिकाणी सेवा स्टॉल्सची उभारणी करण्यात येत आहे. या सेवा स्टॉल्सवर भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, फलाहार आदी सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सेवाकार्यासाठी विविध सेवाभावी संस्था, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना, उद्योजक, शासकीय कार्यालये, बँकिंग क्षेत्र तसेच सेवा देण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी नोंदणी केली आहे. अधिकाधिक भाविकांना उत्तम सेवा देता यावी यासाठी आणखी जास्तीत जास्त संस्था व नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. सेवा हीच खरी श्रद्धांजली असून, सेवा स्टॉलच्या माध्यमातून समाजसेवेची संधी सर्वांनी साधावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

सेवा स्टॉल्सच्या नोंदणीसाठी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तहसीलदार महसूल यांचेशी संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

------------------------------------

## भारतातील ती ठिकाणे जिथे राहणे आणि खाणे आहे अगदी मोफत! खिशावर पडणार नाही भार

फिरण्याची आवड कोणाला नसते दर महिन्याला कुठल्या ना कुठल्या बहाण्याने एखादी व्यक्ती प्रवास करते. पण फिरायला हरकत नाही. कुठेतरी मुक्काम किंवा खाण्याचा प्रश्न येतो, तेव्हा महागड्या हॉटेलांमुळे बरेचदा लोक प्रवासाचे प्लॅन रद्द करतात. तुम्हीही असाच काहीसा विचार करून तुमचा प्लान रद्द केला असेल, तर आम्ही तुम्हाला सर्वोत्तम पर्याय सांगणार आहोत.

प्रवास आणि खाणेपिणे जर बजेटमध्ये करता येत असेल, तर वेगळी बाब आहे. जर तुम्ही कमी खर्चात कुठेतरी फिरण्याचा विचार करत असाल, तर आम्ही तुम्हाला भारतातील अशा काही ठिकाणांबद्दल सांगणार आहोत, ज्यांच्या खर्चात तुमच्या खिशाला कमी पडेल. ही ठिकाणे राहण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य आहेत. याशिवाय येथे खाण्यापिण्यासाठी कोणताही खर्च येणार नाही.

**मणिकरण साहिब**

हिमाचल हे नेहमीच भारतीय लोकांचे आवडते पर्यटन स्थळ राहिले आहे. स्थानिक लोकांसोबतच परदेशी नागरिकही मोठ्या संख्येने येथे भेट देण्यासाठी येतात. हे ठिकाण नैसर्गिक सौंदर्यासाठी ओळखले जाते. जर तुम्ही हिमाचलला येत असाल, तर तुम्ही गुरुद्वारा मणिकरण साहिबला जरूर भेट द्या. येथे तुम्हाला राहण्याची आणि जेवणाची चांगली सुविधा मिळते आणि तुम्हाला कोणतेही पैसे द्यावे लागणार नाहीत.

**भारत हेरिटेज सर्व्हिसेस**

भारत हेरिटेज सर्व्हिसेसची गणना ऋषिकेशमधील सर्वोत्तम ठिकाणांमध्ये केली जाते. लोक येथे शांत वातावरणात वेळ घालवण्यासाठी येतात. विशेष म्हणजे येथे राहणे आणि खाणे पिणे अगदी मोफत आहे. तथापि, त्या बदल्यात तुम्हाला काहीकाळ स्वयंसेवक म्हणून काम करावे लागेल. येथे तुम्ही ऋषिकेशच्या मंदिरांना भेट देऊ शकाल.

**परमार्थ निकेतन**

ऋषिकेशच्या सुंदर आश्रमांमध्ये परमार्थ निकेतनचीही गणना होते. हे ठिकाण गंगा आरतीसाठी ओळखले जाते. येथे कोणत्याही धार्मिक कार्यासाठी आलात, तर मोफत राहता येते. इथे तुम्हाला खाण्यापिण्याचे पैसेही द्यावे लागणार नाहीत, याशिवाय तुम्ही तामिळनाडूला जात असाल, तर रामनाश्रमला नक्की भेट द्या. येथे तुमचा मुक्काम आणि जेवण पूर्णपणे मोफत असेल.

## अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रामेश्वर ब रा. होर्टी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१९.०१.२०२६ रोजी होर्टी गावात ग्राम पंचायत कार्यालयाचे जवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सम पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखु गायछाप पुड्या, किसन तंबाखु तोटे, ब्रिस्टॉल सिगारेट असा एकुण ५०८ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर सोमनाथ वय ४२ वर्षे, रा. होर्टी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१९.०१.२०२६ रोजी होर्टी गावात ग्राम पंचायत कार्यालयाचे जवळ महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सम पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखु गायछाप पुड्या, किसन तंबाखु तोटे, ब्रिस्टॉल सिगारेट असा एकुण ५१३ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द ळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# मित्रांशी वैमनस्य



भौगोलिकदृष्ट्या आपल्या जवळ असलेल्या देशांमध्ये उलथापालथ करणे अमेरिकेने टाळले होते. ट्रम्प यांनी तो धोका पत्करला असून याचे परिणाम अमेरिकेलाच भोगावे लागणार आहेत.

व्हेनेझुएलानंतर ग्रीनलँडचा घास घेण्यास डोनाल्ड ट्रम्प सरसावले आहेत. 'आम्ही अमेरिकन नाही, आणि होणारही नाही' या शब्दांत तेथील नागरिकांनी ट्रम्प यांना सुनावले. ग्रीनलँडची लोकसंख्या कमी असल्याने आणि डेन्मार्ककडे ग्रीनलँडचे नियंत्रण असल्याने आपल्याला सहजासहजी कब्जा मिळवता येईल, असा ट्रम्प यांचा आडाखा आहे; मात्र ग्रीनलँडमधील नागरिकांनी त्यांना तीव्र विरोध दर्शवला आहे. नागरिक रस्त्यावर उतरुन ट्रम्प यांचा निषेध करत आहेत. एका महासत्तेच्या प्रमुखासाठी हे शोभणारे नाही; पण प्रमुखपदी ट्रम्प यांच्यासारखी उन्मादाचे वारे भरलेली व्यक्ती असल्याने त्यांच्यापुढे नीती-अनीती, संकेत, आंतरराष्ट्रीय कायदे यांचा काय पाड? तेलाचे साठे हडपण्यासाठी ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाचा ताबा घेत स्वतःला त्या देशाचे 'कार्यकारी अध्यक्ष' म्हणवून घेतले; पण अमेरिकेतील ज्या तेल कंपन्यांच्या बळावर तेलाची लूट करायची आहे त्या कंपन्या व्हेनेझुएलात येण्यास तयार नाहीत. 'मेक अमेरिका, ग्रेट अगेन' हे ट्रम्प यांचे केवळ हवेतील आश्वासन ठरले. देशातील अपयश लपविण्यासाठी ते जागतिक पातळीवर काही ना काही कुरापती काढून अमेरिकन नागरिकांचे लक्ष अन्यत्र वळवत आहेत. ट्रम्प यांच्याकडून जी - जी पावले टाकली गेली, ती अमेरिका ज्यांना शत्रु मानते त्यांच्या पथ्यावर पडणारी ठरत आहेत.

'नाटो'ला आव्हान?

'नाटो'चा विस्तारवाद रशियासाठी अस्वीकारार्ह होता. युक्रेनच्या युद्धामागे तो मुख्य संदर्भ महत्त्वाचा आहे. सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी 'नाटो'मुळे अमेरिकेवर पडणार्या आर्थिक भाराचा विषय उचलला होता. यातून 'नाटो'चे सदस्य असलेल्या युरोपीय देशांमध्ये अस्वस्थता पसरली. याचे कारण संरक्षणासाठी अमेरिका, अर्थात 'नाटो'वर अवलंबून राहण्याची युरोपीय देशांना झालेली सवय! भविष्यात कधी अमेरिकेकडून 'नाटो'ला आव्हान मिळेल, याची त्यापैकी कुठल्याच देशांनी कल्पना केली नव्हती. ग्रीनलँडमुळे 'नाटो'वर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. रशियाला जे अपेक्षित होते ते अमेरिकेकडून आणि ट्रम्प यांच्याकडून घडत आहे. ग्रीनलँडवर कब्जा करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प कारण मात्र रशिया आणि चीन यांचे देताना दिसतात. 'अमेरिकेची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येईल' असा या अविश्वसनीय व्यक्तीचा तेवढाच खोटेपणाचा युक्तिवाद आहे. जगाची सुरक्षा आणि स्वातंत्र्य यासाठी अमेरिकेने ग्रीनलँडचा ताबा मिळविणे आवश्यक आहे, असे हे महाशय म्हणतात. भारतासारख्या देशाने आतापर्यंत अमेरिकेसह अनेक पाश्चात्य देशांच्या दुटप्पी धोरणाचा अनुभव घेतला, आता युरोपीय देशांना तो येत आहे, एवढाच फरक! पाकिस्तानात ज्याप्रमाणे आपल्या चिरंजीवांच्या क्रिप्टो कंपनीचा व्यवसाय बळकट करण्याचे ट्रम्प यांचे धोरण होते, त्याप्रमाणे ग्रीनलँडकडेही ते व्यवसाय म्हणूनच पाहात आहेत. 'पे पाल' या ऑनलाइन कंपनीचे सहसंस्थापक केन होवरी यांना त्यांनी ग्रीनलँडमधील अमेरिकेचे राजदूत म्हणून नेमले आहे. पाठोपाठ डोनाल्ड ट्रम्प ज्युनियर यांनीही ग्रीनलँडची राजधानी न्यूकचा दौरा केला. ग्रीनलँड हा डेन्मार्कचा स्वायत्त प्रांत आहे; मात्र तेथे अन्य अनेक देशांप्रमाणे अमेरिकेचे तळ आहेत. अमेरिकेच्या अथवा ग्रीनलँडच्या सुरक्षेसाठी ते पुरेसे असताना प्रत्यक्ष ताब्याचा हव्यास, यामागे 'ग्रेटर अमेरिका' या संकल्पनेपेक्षा ट्रम्प यांचे स्वहित हेच मुख्य कारण. चीनने दुर्मिळ खनिज संपत्तीच्या पुरवठ्यावर नियंत्रण आणल्यावर पुरवठा साखळीत व्यत्यय येऊ नये यासाठी ट्रम्प यांना ग्रीनलँड पाहिजे, असे सांगितले जात असले तरी डेन्मार्कच्या मार्फत ती व्यवस्था करणे त्यांना अशक्य नव्हते. युरोपीय देशांनी विरोधाचा सूर लावताच ट्रम्प यांनी फ्रान्स, जर्मनी, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क, इंग्लंड यांसह आठ युरोपीय देशांवर दहा टक्के आयात शुल्क लादले आहे. कोणत्याही स्थितीत अमेरिका विसंबून राहता येईल असा देश नाही, याची पुरेपूर जाणीव अमेरिकेच्या मित्र देशांना झाली असून जागतिक पातळीवर याचे दूरगामी परिणाम होतील. अमेरिकेचे ५१ वे राज्य, असा उल्लेख होणार्या कॅनडाने तर थेट चीनशी व्यापार आणि अन्य मुद्द्यांवर बोलणी सुरु केली. युरोपीय देशांचा अमेरिकेच्या परवानगीविना रशियाशी संवाद, ही एकेकाळी अशक्यप्राय बाब होती, ती देखील प्रत्यक्षात येत आहे.

# निरोगी राहण्यासाठी या सवयी फायद्याच्या




जेवणाच्या चांगल्या सवयीनमुळेच जपानी लोकांना पोटासंबंधी तक्रारी जाणवत नाहीत.

भारतीयांनी जापानी लोकांकडून कोणत्या चांगल्या खाण्याच्या सवयी शिकल्या पाहिजेत हे जाणून घेऊया. (झर्हीं : झळुरलरू)

जपानी लोकांना आपली जीवनशैली निरोगी कशी ठेवावी हे पुरेपूर माहित आहे. जेवणाच्या चांगल्या सवयीनमुळेच त्यांना पोटासंबंधी तक्रारी जाणवत नाहीत. अन्न हळूहळू चावून खाणे, आहारात हिरव्या भाज्यांचा समावेश, ग्रील केलेले, वाफवलेले किंवा उकळलेले अन्न खाणे आणि वेळेवर अन्न खाणे या त्याच्या चांगल्या सवयींपैकी एक आहेत. एवढेच नाही तर निरोगी राहण्यासाठी ते भरपूर चालतात. आपणही जपानी लोकांच्या खाण्याच्या सवयी आत्मसात केल्या तर आपण सहज निरोगी राहू शकतो. आपण जपानी लोकांकडून कोणत्या चांगल्या खाण्याच्या सवयी शिकल्या पाहिजेत हे जाणून घेऊया.

जेवणासाठी चॉपस्टिक्सचा वापर करणे : जपानी लोक चॉपस्टिक्सच्या मदतीने जेवण करतात. यामुळे अन्न कमी प्रमाणात खाल्ले जाते ज्यामुळे त्यांचे पचन व्यवस्थित होते. भारतीयांनी देखील जपानी लोकांप्रमाणे जेवण केल्यास पचनक्रिया सुधारेल आणि अन्न सहज पचेल.

# सार्थक जीवन



सुख व धर्माची स्थापना करणेच मानवी जीवनाचे लक्ष्य आहे. ईश्वराने जी शक्ती व पात्रता मानवाला दिली आहे तिचा सदुपयोग दुसऱ्यांची मदत करणे, त्याचे जीवन सुखी करण्यात आहे. शारीरिक गरजांची पुर्तता करण्यासाठी मेहनत आवश्यक आहे. जीवनातील अडचणी सोडवून जो वेळ व शक्ती मिळते त्यास विश्वकल्याणात खर्च केले पाहिजे कारण हेच सर्व शास्त्रांचे सार आहे-

श्अष्टादश पुराणेषु
व्यासस्य वचनं द्वयम,
परोपकाराय पुण्याय
पापाय पर पीडनम्श।

तात्पर्य म्हणजे मनुष्य जीवनाचा उद्देश परोपकार व पुण्यच आहे. जो मनुष्य जीवनात येऊन आपली विचारसरणी व भावनांना शुष्कता, नीरसता व कठोरता सारख्या दोषातून मुक्त होऊ शकला नाही तो जीवनाच्या वास्तविक रसग्रहण करण्यापासून वंचितच राहिल. आनंदाचा स्त्रोत चांगल्या अनुभवांमध्ये आहे. भक्ती-प्रेम-समर्पण व सत्योपासनाद्वारे ईश्वर प्राप्त करणे शक्य आहे. ज्यांचे अंत:करण शुद्ध आहे, जे भावनांना मनात स्थान देत नाही त्यांना ईश्वर प्राप्ती सहज होते. मानवी जीवनाचा बहुतांशी भाग आहार, निद्रा, भय इत्यादीत जातो. शारीरिक गरजा पुर्ण करण्यात बराच वेळ व शक्ती खर्च होते. एवढ्याच गोष्टी व्यस्त राहणे मानवी जीवनाचे लक्ष्य है? सृष्टीतील सर्व जीवांमध्ये सर्वश्रेष्ठ असल्यामुळे मानवाचे उत्तरदायित्व सुद्धा श्रेष्ठ आहे. जो आपल्या कर्तव्याकडे लक्ष देत नाही तो नक्कीच मनुष्यत्वाचा महान गौरव प्राप्त करण्याचा अधिकारी नाही. अमाप पैसा किंवा भौतिक सुख मिळवूनही जीवन खरेदी केले जाऊ शकत नाही. सद्भावच मानवाची सत्य व स्थायी संपत्ती आहे म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणाला सदगुण-संपादनातच खर्च करणे बुद्धिमत्ता आहे. मानवी जीवनास यशस्वी बनवणेच खरी दुरदृष्टीता आहे.

(क्रमशः कालच्या अंकातून)

# तुम्हालाही सतत जांभई येते?



परंतु, काही प्रकरणांमध्ये जास्त जांभई येणे हे शारीरिक विकार किंवा गंभीर झोपेच्या अभावापलीकडे आरोग्य समस्यांचे लक्षण असू शकते. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थच्या मते, काही लोकांमध्ये जास्त जांभई येणे ही व्हॅगस नर्व्हमुळे होणारी प्रतिक्रिया असू शकते, जी हृदयाची समस्या दर्शवू शकते. इतर दुर्मिळ प्रकरणांमध्ये, हे मेंदूच्या अनेक समस्या देखील सूचित करू शकते.

थशळसहीं ङीें ढीळलझ्ी : वजन कमी करायचे आहे? मग झोपण्यापूर्वी करा मयाफ २० गोष्टी जांभई हा मेंदूला थंड करण्याचा मार्ग आहे

ॠपळपस-षशारश्रश-वीळींशी खारसश ऊीशवळीं: ळडींलझ्र

नॅशनल जिओग्राफिक मधील एका अहवालानुसार, तोंड उघडे ठेवून जांभई दिल्याने सायनसच्या नसा फुगतात आणि आकुंचन पावतात. आपल्या मेंदूमध्ये जास्त हवा पंप करतात. यामुळे मेंदूचे तापमान कमी होते. गुलकंद आहे उन्हाळ्याचा खरा साथीदार; जाणून गुलकंद खाण्याचे फायदे

६. गर्भात असलेली बाळे देखील जांभई देतात

लहान बाळांना जांभई घेताना पाहणे हा एक अतिशय गोंडस आणि मोहक क्षण आहे यात शंका नाही, परंतु तुम्हाला कदाचित माहित नसेल की बाळांना त्यांच्या आईच्या पोटातही जांभई येते. आपल्याला नेमके का माहित नाही, परंतु हे सिद्ध झाले आहे की गर्भात विकसित होणारे गर्भ देखील जांभई देतात. आईला जांभई देताना पाहून त्याला जांभई येते का, असा प्रश्न आता आपल्याला पडतो!

७. तुमची ७ ते ८ तासांची झोप पूर्ण करा

बहुतेक प्रकरणांमध्ये, जांभई येणे हे झोपेच्या कमतरतेचे लक्षण आहे, म्हणून आमचा सर्वांना सल्ला आहे की तुमची ७ ते ८ तासांची झोप पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. महत्त्वाच्या बैठकीदरम्यान किंवा अत्यंत महत्त्वाच्या वर्गात सतत जांभई येणे केवळ लाजिरवाणेच नाही तर काही वेळा त्रासही होऊ शकतो हे आपल्यापेक्षा चांगले कोणीही जाणत नाही. चांगल्या झोपेसाठी तुम्ही जीवनशैलीत काही बदल करू शकता आणि काही आरामदायी व्यायाम देखील करू शकता. जांभई देणे निषिद्ध नाही, तरीही तुम्हाला सुस्त आणि झोपेची कमतरता का वाटेल, जी कॉफीचे अनेक कप देखील बरे करू शकत नाही. प्रत्येक जांभईने एक चक्र सुरू होते जे कोणीही थांबवू शकत नाही आणि त्या वातावरणात काम करणे कोणासाठीही मनोरंजक नाही.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील. (क्रमश. )

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game kheltehoe?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार


ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.
– डॉन प्याट



**संस्कृत सुभाषित**
रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।
देशे देशे गुणव्वेव मवस्थास्त्वमविक्रियः।।

**मराठीत अर्थ**
आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारत-न्यूझीलंड टी-२० मालिकेतील सामने किती वाजता सुरू होणार?

दिल्ली-भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे मालिकेनंतर आता टी-२० मालिकेला सुरूवात होणार आहे. उभय संघांमधील ही टी-२० मालिका २१ जानेवारीपासून सुरू होत आहे. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकापूर्वी होणारी ही मालिका संघासाठी महत्त्वाची असणार आहे. या मालिकेसाठी न्यूझीलंड संघातील उर्वरित खेळाडू भारतात दाखल झाले आहेत. टी-२० मालिकेतील सामने किती वाजता सुरू होणार आणि कुठे लाईव्ह पाहता येणार, जाणून घ्या. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच टी-२० सामने खेळवले जातील. २०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी दोन्ही संघांमधील ही शेवटची मालिका आहे. ही दोन्ही संघांना त्यांच्या खेळाडूंची तयारी करण्याची आणि चाचणी घेण्याची शेवटची संधी आहे. भारतीय संघाचं नेतृत्त्व कर्णधार सूर्यकुमार यादवकडे असणार आहे. तर उपकर्णधारपदाची जबाबदारी अक्षर पटेलच्या खांद्यावर असेल. या मालिकेतील पहिला सामना नागपूरमध्ये खेळ-वला जाणार आहे.

### पाकिस्तानचा २४ तासात यु-टर्न! टी-२० विश्व चषक २०२६ ला बायकॉट करणार? पीसीबी चा सरप्राईज निर्णय

दिल्ली-आगामी टी-२० वर्ल्ड कपच्या आयोजनावरून क्रिकेट जगतात सध्या मोठी खळबळ उडाली आहे. बांगलादेश आणि आयसीसी यांच्यात सुरू असलेल्या वादामुळे पाकिस्तान देखील या स्पर्धेतून माघार घेण-ार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. पाकिस्तानने बांगलादेशविरुद्धच्या भडकलेल्या आगीत तेल ओतण्याचं काम केलंय. अशातच आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने २४ तासात यु-टर्न घेतल्याचं पहायला मिळतेय.पीसीबीने कोणता निर्णय घेतला? पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या सर्व अफवांना पूर्णविराम दिला असून स्पर्धेतून माघार घेण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केलं आहे. मरेवस्पोर्ट्सफ्ने दिलेल्या अहवालानुसार, बांगलादेशच्या समर्थनार्थ पाकिस्तान वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकणार असल्याच्या बातम्या फेटाळून लावण्यात आल्या आहेत. पीसीबीच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितलं की, माघार घेण्याचा असा कोणताही निर्णय बोर्डाचा नाही.

### साइना नेहवाल दोन वर्षांपासून आजारामुळं होती त्रस्त

मुंबई-भारताच्या यशस्वी बॅडमिंटनपटूंपैकी एक आणि ऑलिम्पिक पदक विजेती साइना नेहवालनं बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर केली आहे. गेल्या जवळपास दोन वर्षांपासून गुडघ्याच्या आजारामुळं मैदानाबाहेर असलेल्या साइनानं ही घोषणा सोमवारी एका पॉडकास्टमध्ये केली. लंडन २०१२ ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या साइनाने २०२३ मधील सिंगापूर ओपननंतर कोणताही स्पर्धात्मक सामना खेळलेला नाही. तिने सांगितले की, ती दोन वर्षांपूर्वीच खेळ सोडणार होती, पण औपचारिक घोषणा करण्याची गरज वाटली नव्हती.गुडघ्याला गंभीर दुखापत : साइनाच्या निवृत्तीमागचे मुख्य कारण आहे तिच्या गुडघ्यांमधील कार्टिलेजचे पूर्ण नष्ट होणे. तिने पॉडकास्टमध्ये सांगितले, मफ्माझे कार्टिलेज पूर्णपणे नष्ट झाले असून संधिवात झाला आहे. मी पालक आणि प्रशिक्षकांना सांगितले की, आता मी हे करू शकणार नाही.फ्फ जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचण्यासाठी दररोज आठ-नऊ तास कठोर सराव करावा लागतो .

### सूर्याचा मोठा निर्णय! पहिल्या टी-२० मध्ये श्रेयस अय्यर नव्हे, तर हाखेळाडू तिसऱ्या क्रमांकावर खेळणार

दिल्ली-भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २१ जानेवारीला खेळवला जणार आहे. याआधी झालेल्या वनडे मालिकेत भारतीय संघाला २-१ ने दारूण पराभवाचा सामना करावा लागला होता. आता टी-२० मालिका जिंकून भारतीय संघ दमदार पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. या सामन्यासाठी श्रेयस अय्यर आणि इशान किशन या दोघांनाही संघात स्थान देण्यात आलं आहे, पण प्लेईंग ११ मध्ये कोणाला संधी मिळणार? हे अजूनही निश्चित झालेलं नाही. दरम्यान या सामन्यापूर्वी तिसऱ्या क्रमांकावर कोण खेळणार, याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणाऱ्या टी-२० मालिकेआधी भारतीय संघाला २ मोठे धक्के बसले.



ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे झालेल्या ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या पहिल्या फेरीच्या सामन्यादरम्यान रिटर्न शॉट खेळताना पोलंडची इगा स्वाटेक.

# भारताची फुलराणी: सायना नेहवालची निवृत्तीची घोषणा

## या दुखापतीमुळे कारकिर्दीला लावला पूर्णविराम; म्हणाली, मी दोन वर्षांपूर्वी

मुंबई : भारताची फुलराणी म्हणून ओळखली जाणारी 'स्टार बॅडमिंटन' खेळाडू सायना नेहवालने निवृत्ती जाहीर केलीय. गेली काही वर्ष खेळाप-ासून दूर असलेल्या सानियाने अखेर निवृत्तीची घोषणा केली. २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये तिने शेवटची स्पर्ध खेळली होती. त्यानंतर गुडघ्याच्या दुखापतीमुळे ती बऱ्याच काळापासून कोर्टपासून दूर राहिली. सानियाने दोन वर्षांपूर्वी एका पॉडकास्टमध्ये तिच्या दुखापतीबाबत आणि निवृत्तीवर भाष्य केले होते. मी दोन वर्षांपूर्वीच खेळणे सोडले होते. मला वाटले की, मी माझ्या अटींवर खेळायला सुरुवात केली होती तर माझ्या अटींवरच निवृत्ती घेईल. त्यामुळे मला निवृत्तीची काही घोषणा करण्याची गरज नाही. जर तुम्हा खेळण्यासाठी सक्षम नसाल तर काही हरकत नाही, असे सायना नेहवाल म्हणाली होती. आता निवृत्तीचा निर्णय गुडघ्याच्या गंभीर समस्येमुळे घेण्यात आला, ज्यामुळे प्रशिक्षण घेणे अशक्य झाले होते, असे सायना नेहवाल म्हणाली.



गुडघ्याची गादी पूर्णपणे खराब झाली, संधीवाताचा त्रास आहे ही गोष्ट माझ्या पालकांना आणि प्रशिक्षकाला माहित असायला हवी होती. मी त्यांना फक्त एवढेच सांगितले, आता कदाचित मी हे आणखी करू शकणार नाही, हे कठीण आहे. लोकांना हळूहळू कळायला लागले होते की, सायना खेळत नाहीये. जगात सर्वोत्तम बनण्यासाठी तुम्ही आठ ते नऊ तास प्रशिक्षण घेता पण माझा गुडघा एक किंवा दोन तासांतच साथ देत होता, असे ही सायना नेहवालने म्हटले. सायना नेहवाल बॅडमिंटनमध्ये ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली. २०१५ मध्ये ती जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी पोहा-ेचली होती. २००८ मध्ये तिने बीडब्ल्यूएफ वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप जिंकली, तर २०१० मध्ये तिने सुपर सीरिजचे विजे-तेपद पटकावले. २०१० आणि २०१८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये तिने सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धांमध्ये दोन एकेरी सुवर्णपदके जिंकणारी ती पहिली भारतीय बॅडमिंटनपटू आहे. भारत सरकारने तिला २००९ मध्ये अर्जुन पुरस्कार, २०१० मध्ये मेजर ध्यानचंद खेल रत्न, २०१० मध्ये पद्मश्री आणि २०१६ मध्ये पद्मभूषण यांसारख्या प्रतिष्ठित नागरी आणि क्रीडा सन्मानांनी गौरवले आहे.सायनाच्या निवृत्तीमुळे भारतीय बॅडमिंटनला मोठा धक्का बसला आहे. तिने आपल्या कारकिर्दीत अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा दिली आहे. तिच्या खेळा-तील आक्रमकता आणि चिकाटी नेहमीच वाखाणण्याजोगी राहिली आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे तिला बऱ्याचदा वेदना सहन कराव्या लागल्या, तरीही तिने हार मानली

# भारत-न्यूझीलंड पहिला ट्वेन्टी-२० सामना आज नागपु-



## विश्वचषक पूर्वतयारीची अखेरची संधी!

**वेळ : सायं. ७ वा.**

**थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.**




नागपूर-ट्वेन्टी-२० विश्वचषकाला आता तीन आठवड्यांहूनही कमी कालावधी शिल्लक असून या स्पर्धेच्या तयारीसाठी भार-ताला अखेरची संधी न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत मिळणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेला आज, बुधवारी नागपूर येथे सुरुवात होईल, तेव्हा कर्णधार सूर्यकुमार याद-वला सूर गवसतो का, याकडे चाहत्यांचे विशेष लक्ष असेल. सूर्यकुमारने २०२४ साली भारताच्या ट्वेन्टी-२० संघाची पूर्णवेळ धुरा सांभाळली. तेव्हा-पासून भारताने उत्कृष्ट कामगिरी करताना आपले ७२ टक्के सामने जिंकले आहेत. कर्णधार म्हणून सूर्यकुमारने सातत्याने छाप पाडली असली, तरी फलंदाजीत त्याची कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या २२ ट्वेन्टी-२० डावांत सूर्यकुमारला एकही अर्धशतक करता आलेले नाही. त्याने अखेरचे अर्धशतक ऑक्टोबर २०२४ मध्ये बांगलादेशविरुद्ध केले होते. त्यामुळे कामगिरी उंचावण्यासाठी त्याच्यावर मोठे दडपण आहे. तो लयीत आल्यास मायदेशात होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेपूर्वी भारतीय फलंदाजीला अधिक बळकटी मिळेल.

तुल्यबळ प्रतिस्पर्धी

भारतीय संघाला एकदिवसीय आणि कसोटी क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करता आलेली नाही. मात्र, भारताच्या ट्वेन्टी-२० संघाने चमकदार कामगिरी केली आहे. ट्वेन्टी-२० प्रारूपात २०२४ मध्ये विश्वचषक जिंकल्यानंतर भारताने गेल्या वर्षी आशिया चषक स्पर्धेचेही जेतेपद पटकावले. परंतु आता त्यांना न्यूझीलंडच्या रूपात तुल्यबळ प्रतिस्पर्ध्याला सामोरे जावे ला-गणार आहे. न्यूझीलंडने भारतात कसोटीपाठोपाठ एकदिवसीय मालिका जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आता त्यांचा विजयरथ रोखण्याचे आव्हान सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील संघासमोर आहे.तिलकच्या अनुपस्थितीत इशान तिसऱ्या क्रमांकावर

- भारताचा गुणवान फलंदाज तिलक वर्मा जायबंदी झाला असून या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांना तो मुकणार हे निश्चित आहे. त्याच्या अनुपस्थितीत भारताकडे श्रेयस अय्यर आणि इशान किशन या दोघांचा पर्याय होता. यापैकी किशनला पसंती देण्यात आली आहे.- तिलकप्रमाणेच इशानही डावखुरा फलंदाज आहे. त्याने यंदाच्या देशांतर्गत हंगामातील मुश्ताक अली ट्वेन्टी-२० आणि विजय हजारे एकदिवसीय या स्पर्धांत चमकदार कामगिरी केली. त्यामुळे त्याच्यासाठी भारतीय संघाची दारे पुन्हा खुली झाली.- भारताच्या डावाची सुरुवात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन करतील. इशान तिसऱ्या, तर कर्णधार सूर्यकुमार चौथ्या क्रमांकावर खेळेल. अष्टपैलू हार्दिक पंड्या लयीत असून त्याची कामगिरी भारतासाठी निर्णायक ठरू शकेल. गोलंदाजीची भिस्त जसप्रीत बुमरावर असेल.

- विजयवीराच्या भूमिकेसाठी शिवम दुबे आणि रिंकू सिंह यांच्यात स्पर्धा असू शकेल. फिरकीची धुरा उपकर्णधार अक्षर पटेल, कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्ती सांभाळतील.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या २५ पैकी १८ सामने जिंकले आहेत. त्यामुळे आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत जेतेपदासाठी भारतालाच प्रमुख दावेदार मानले जात आहे. दुसरीकडे, न्यूझीलंडच्या संघानेही अप्रतिम कामगिरी केली आहे. २०२४ सालच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकानंतर न्यूझीलंडने २१ सामने खेळले असून त्यापैकी १३ जिंकले आहेत. एकदिवसीय मालिकेला मुकलेला नियमित कर्णधार मिचेल सँटनर, तसेच प्रतिभावान फलंदाज रचिन रवींद्र यांचे ट्वेन्टी-२०

### भारत आणि न्यूझीलंड संघ

**भारत :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), अभिषेक शर्मा, इशान किशन, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, रिंकू सिंह, अक्षर पटेल, कुलदीप यादव, वरूण चक्रवर्ती, जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग, रवी बिश्नोई, हर्षित राणा, श्रेयस अय्यर.

**न्यूझीलंड :** मिचेल सँटनर (कर्णधार), डेव्हॉन कॉन्वे (यष्टिरक्षक), बेवन जेकब्स, डॅरेल मिचेल, ग्लेन फिलिप्स, टीम रॉबिन्सन, जिमी नीशम, इश सोधी, झॅक फॉल्क्स, मार्क चॅपमन, मायकल ब्रेसवेल, रचिन रवींद्र, काएल जेमिसन, मॅट हेन्री, जेकब डफफी, क्रिस्टियन क्लार्क.



# पुणे ग्रँड सायकल टूरमध्ये अपघात

५० हून अधिक सायकलपटू एकमेकांवर धडकले...

पुणे : मुळशी तालुक्यात आज 'पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूर' दरम्यान मुळशी-कोळवण रस्त्यावर अरुंद रस्त्याचा अंदाज न आल्याने सायकलपटूंचा अपघात झाला. यामध्ये ७० हून अधिक सायकलपटू एकमेकांवर आदळले असून बरेच खेळाडू जखमी झाले आहेत.

मुळशीतील कोळवण रोडवरून ही स्पर्धा जात असताना रस्त्याची रुंदी अचानक कमी झाली. ताशी ६० ते ७० किमी वेगाने धावणाऱ्या सायकलपटूंना या अरुंद रस्त्याचा आणि तीव्र वळणाचा अंदाज आला नाही. आघाडीच्या सायकलपटूचा ताबा सुटल्याने मागून येणारे खेळाडू एकापाठोपाठ एक एकमेकांवर आदळले. या साखळी अपघातामुळे बरेच खेळाडू ट्रॅक सोडून बाजूला गेले. प्राथमिक माहितीनुसार, बरेच खेळाडू किरकोळ जखमी झाले असून ४ ते ५ खेळाडूंना दुखापत झाल्याने तातडीने त्यांच्यावर उपचार करण्यात आले. तसेच साधारण १५ मिनिटांच्या ब्रेकनंतर ही स्पर्धा पुन्हा सुरु झाली.

प्रशासनाच्या नियोजनावर संताप

आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा आयोजित करताना जिल्हा प्रशासनाने रस्त्यांच्या स्थितीचा विचार केला नव्हता का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. कोळवण रस्त्यावरील अरुंद भागाची माहिती खेळाडूंना आधीच देण्यात आली नव्हती, असा आरोप होत आहे. वळणावर सुरक्षेसाठी आवश्यक असणारी बॅरिकेटिंग किंवा धोक्याच्या सूचना देणारे फलक कमी असल्याचे दिसून आले. तुम्ही ही सायकल स्पर्धा जिओ हॉटस्टारवर पाहू शकता.

# गौतम गंभीरच्या विरोधात मैदानात नको नको त्या घोषणा

दिल्ली-भारत आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवण्यात आली. या मालिकेत न्यूझीलंडने भारताचा २-१ ने पराभव केला. ३८ वर्षांच्या इतिहासात न्यूझीलंडने पहिल्यांदाच भारतात येऊन टीम इंडियाचा एकदिवसीय सामन्यात पराभव केला. दरम्यान, तिसऱ्या एकदिवसीय सामना संपल्यानंतरचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये सामना पाहण्यासाठी मैदानात आलेले प्रेक्षक गौतम गंभीर हाय-हाय.. अशा घोषणा देत आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा एकदिवसीय सामना संपल्यानंतर बक्षीस समारंभ सुरु होते. यावेळी रोहित शर्मा, विराट कोहलीसह टीम इंडियामधील अन्य खेळाडूही मैदानात उपस्थित होते. यादरम्यान, स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांकडून गौतम गंभीरच्या विरोधात घोषणा देण्यात येत होत्या. गौतम गंभीर हाय-हाय.. अशी घोषणा काही प्रेक्षकांकडून दिल्या असल्याचे व्हिडीओमधून दिसत आहे. सदर प्रकार बघून विराट कोहलीनेही डोक्याला हात लावल्याचे दिसून आले. भारतीय भूमीवर न्यूझीलंडने भारताविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकण्याची ही पहिलीच वेळ होती. मालिकेच्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाने ४ विकेट्सने आघाडी घेतली होती, परंतु त्यानंतर न्यूझीलंडने उर्वरित दोन्ही सामने जिंकून मालिका जिंकली. मालिकेत विराटच्या फलंदाजीने शानदार

# भारतासोबतचा वाद चर्चेतून मिटवा : तमीम इकबाल

नवी दिल्ली : बांगलादेशचा माजी कर्णधार तमीम इकबाल याने भारत आणि बांगलादेशामधील क्रिकेटच्या संबंधातील तणाव चर्चेने कमी करावा असे म्हटले होते. यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे संचालक एम नजमूल इस्लाम यांनी तमीम इकबालला भारतीय एजंट म्हणून त्याची खिल्ली उडवली. गेल्या काही दिवसांपासून बीसीबी आमि बीसीसीआय आमने सामने आले आहेत. बीसीसीआयच्या आदेशाने कोलकाता नाईट रायडर्स संघानं मुस्तफिजूर रहमानला संघातून वगळावे लागले. बांगलादेशाने आयपीएलच्या सामन्यांचे प्रसारण करण्यावर देखील बंदी घातली आहे. आयसीसीने टी २० वर्ल्ड कपमधील सामने श्रीलंकेत खेळण्यास परवानगी द्यावी, असं बांगलादेशाने म्हटले आहे. तमीमने म्हटलें होते की, तो बीसीबीसोबत जोडलेला नाही, कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणं मीडियातून माहिती मिळाली आहे. मात्र, जे लोक हे प्रकरण पाहत आहेत, त्यांच्याकडे अधिक माहिती नसेल, असं तमीम इकबाल म्हणाला. मला अचानक प्रतिक्रिया द्यायची नाही, मात्र, कोणताही निर्णय घेण्यापूर्वी बांगलादेश क्रिकेटच्या हिताचा, भविष्याचा आणि इतर गोष्टींचा विचार केला पाहिजे. जर एखादी गोष्ट चर्चेतून सुटत असेल तर त्यापेक्षा चांगलं काही असू शकत नाही, असं तमीम इकबाल म्हणाला होता तमीम इकबाल यानं सप्षटपणे म्हटलं की बांगलादेश क्रिकेटला ९० ते ९५ टक्के पैसे आयसीसीकडून मिळतात, त्यामुळं कोणतंही वक्तव्य सार्वजनिकपणे करण्यापूर्वी त्याचा विचार करावा, असं वक्तव्य करुन नये ज्यातून मागं हटणं अडचणीचं ठरेल, असं तमीम इकबाल म्हणाला होता.



बीसीबीचे संचालक एम नजमुल इस्लाम यांनी कमेंट करत एक फोटो शेअर करत तमीम इकबाल याला इंडियन एजंट म्हणत खिल्ली उडवली. बीसीबीच्या अधिकार्या कमेंटमुळं बांगलादेशमधील क्रिकेट चाहते संतापले आहेत. तमीमसह इतर खेळाडू देखील संतापले आहेत. मोमिनुल हक, तस्कीन अहमद आणि तैजुल इस्लाम यासह इतर खेळाडूंनी सोशल मिडिया पोस्ट करत बीसीबीच्या संचालकाचा विरोध केला. तस्कीन यानं म्हटलं की क्रिकेट बांगलादेशचा प्राण आहे. एका माजी कॅप्टनबद्दल एक कमेंट करण्यात आली, ज्यानं खेळात मोठं योगदान देण्यात, यामुळं अनेक लोकांनी संताप व्यक्त केला.

## अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांचा दौरा

**लातूर प्रतिनिधी:** राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे हे २१ ते २३ जानेवारी २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीसाठी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. या दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. धाराशिव येथून २१ जानेवारी रोजी रात्री त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम करतील.

राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. लोखंडे यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची बैठक होईल. यावेळी ते राबविण्यात येणाऱ्या योजनांचा, तसेच आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी करणार आहे. तसेच अनुसूचित जाती जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी, लाड पागे, दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना, घरकुल योजना,अनुदानाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे. यानंतर दुपारी १२ वाजता लातूरचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांच्या समवेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व खर्चाचा आढावा घेऊन चर्चा करतील.

दुपारी १ वाजता अहमदपूर नगरपरिषद मुख्याधिकारी, दुपारी २ वाजता चाकूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, दुपारी ३.३० वाजता जळकोट नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, सायंकाळी ५ वाजता औसा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता निलंगा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, दुपारी १२.३० वाजता रेणापूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, दुपारी २ वाजता शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, सायंकाळी ५ वाजता देवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची आढावा बैठक घेणार आहेत. यावेळी विविध योजनांचा, तसेच आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी करणार आहे. तसेच अनुसूचित जाती जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी, लाड पागे, दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना, घरकुल योजना,अनुदानाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे. २४ जानेवारी रोजी ते लातूर येथून पुणेकडे रवाना होतील.

## दयानंद विज्ञानच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून दिले पर्यावरण संवर्धनाचे धडे



**लातूर प्रतिनिधी:** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान मंडळाच्या वतीने मोजे दावतपुर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संरक्षणासंदर्भात जनजागृती व्हावी म्हणून दि.१८ जानेवारी २०२६ रोजी पथनाट्य सादर करण्यात आले.हे पथनाट्य सादर करण्यासाठी विज्ञान मंडळाचे समन्वयक प्रा.शिलेश गावित,डॉ.दीप्ती ढेरे, डॉ. श्वेता लोखंडे,प्रा.ऐश्वर्या अंधारे,प्रा.पूजा नंदगावे यांनी मार्गदर्शन केले.या पथनाट्य सादरीकरणात प्रज्वल लामतूरे, ओंमकार चव्हाण,ओंमकार कापसे,वेदांती वाघे,वर्चस्वी पटणी,आकांक्षा मणियार, निकिता जाधव,राजनंदिनी देशमुख,राधा जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सदरील पथनाट्य सादर करताना बेकायदेशीर वृक्षतोड थांबवा,पाणी आडवा,पाणी जिरवा,झाडे लावा,झाडे जगवा,सेंद्रिय शेती करू,विषमुक्त खाऊ,प्लास्टिक टाळू,कागद वापरू,निसर्गाचा करू नका ऱ्हास,नाही तर होईल श्वासाचा त्रास,पर्यावरण रक्षण हेच आपले कर्तव्य अशा विविधांगी स्वरूपाचे धडे ग्रामस्थांना दिले.याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर,डॉ.सुरज कोल्हे,प्रा.मेघा आञाम,विज्ञान मंडळ अध्यक्ष यश झंवर,विना भंडारी,प्रिया गोराड व रासेयो स्वयंसेवक,इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शाहिदी समागमाच्या निमित्ताने नांदेडमध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन

### राष्ट्रभक्तीचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्याचा मुख्य उद्देश - राज्यमंत्री माधुरी मिसाळ



**नांदेड प्रतिनिधी:** श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शाहिदी समागमाच्या निमित्ताने 'हिंद दी चादर' अंतर्गत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अल्पसंख्याक व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. हा दोन दिवसीय कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होणार असून यामध्ये देशभरातून १० ते १२ लाख नागरिकांची उपस्थिती अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. या ऐतिहासिक कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध राज्याचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, संत-महंत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विविध समाजघटकांचा सहभाग या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असून सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव वारकरी संप्रदायातील मोठ्या संख्येने नागरिक या समागमात सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांपर्यंत व तरुण पिढीपर्यंत देशासाठी बलिदान देणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांची माहिती पोहोचवणे हा आहे. श्री गुरु तेग बहादूरजी यांनी धर्म, मानवता व राष्ट्रासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान आजच्या पिढीपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ती, त्याग व सामाजिक ऐक्याची भावना अधिक दृढ होईल, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी नमूद केले.

दि. २५ जानेवारी रोजी होणारा मुख्य कार्यक्रम यशस्वी करून श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या बलिदानाचा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवण्याचा संकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले. या भव्य समागमाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक मूल्यांचा जागर करण्यात येणार असल्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर आधारित शुभेच्छा पत्र स्पर्धेचे आयोजन

**नाशिक प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर आधारित राज्यस्तरीय शुभेच्छा पत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल.

वद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास रोख चार हजार रुपयांचे तर द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास अनुक्रमे रोख तीन व दोन हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाकवी वामनदादांच्या कोणत्याही एका गीताची निवड करून त्यावर आधारित वर्तमानकालीन भाष्य करणारे लेखन करायचे आहे. हे शुभेच्छा पत्र ए फोर आकाराच्या कागदावर तयार करणे आवश्यक असून त्यावर दोन्ही बाजूंनी पाठपोट लिहिता येईल. शुभेच्छा पत्र अधिक आकर्षक बनवण्यासाठी हाताने काढलेली चित्रे किंवा संगणकीय आरेख्नाचा वापर करता येईल. ही स्पर्धा पर्यावरणपूरक असावी यासाठी विद्यार्थ्यांना सुकलेली पाने, फुले आणि बिया यांसारख्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत भाग घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नाव, पत्ता, शिक्षणक्रम, भ्रमणध्वनी क्रमांक आणि कायम नोंदणी क्रमांकासह तयार केलेले शुभेच्छा पत्र येत्या दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रा. विजयकुमार पाईकराव, प्रमुख, महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, पिन क्रमांक - ४२२२२२ या पत्त्यावर टपालाने पाठवायचे आहे.

## एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, अडसूळ यांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश





**लातूर प्रतिनिधी:** लातूर दि. २० - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवार रोजी भारतीय जनता पार्टीत अनेकांनी जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे, लालासाहेब पाटील, विजय काळे, सुनील पाटील, लक्ष्मीकांत घुटे, दत्ता सप्काळ, राम गाडे, ॲड. धनराज शिंदे, बालाजी गवळी यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड हे संपूर्ण मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत. त्यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. या निधीतून होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, माजी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब रोडके, अमर इंगळे, तानाजी शिंदे, शत्रुघन गोरडे, संजय मोरे, प्रभावती इंगळे आणि बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या प्रत्येकांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असे सांगून यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

**हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रम**

## लातूर येथे आयोजित शालेय चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**लातूर प्रतिनिधी:** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त लातूर जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत शालेय चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड रोडवरील यशवंत विद्यालयात आयोजित या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या स्पर्धेचे जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे अब्दुल शेख, यशवंत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. सुवर्णा जाधव या उपस्थित होत्या, तसेच स्पर्धेचे समन्वयक म्हणून चित्रकार शिवाजी हांडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेविषयी नियमांविषयी माहिती दिली. लातूर जिल्ह्यातील सर्व १० तालुकास्तरीय स्पर्धांमधून निवड झालेले ३० यावेळी विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षक म्हणून चंद्रशेखर भालेराव व तेजस शेरखाने यांनी काम पहिले. स्पर्धक विद्यार्थ्यांनी यावेळी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित विविध चित्रे रेखाटली.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे प्रवेश सुरु



**नाशिक प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत असलेल्या विविध ८८ शिक्षणक्रमांचे शैक्षणिक सत्र जानेवारी २०२६ करीता नवीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आलेले आहेत. तसेच जानेवारी २०२५ या सत्रात ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेला आहे; अशा विद्यार्थ्यांसाठी द्वितीय वर्षाचीही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठीची अंतिम मुदत ही येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. शासनाचे नवीन शैक्षणिक धोरण व विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षणक्रम, बी. एड. (सेवांतर्गत), बी. एड. (विशेष) तसेच विज्ञान विद्याशाखेच्या शिक्षणक्रमांव्यातिरिक्त उर्वरित सर्व शिक्षणक्रमांसाठी जानेवारी २०२६ या सत्राकरिता प्रवेश प्रक्रियेची पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. विद्यार्थ्यांना नियमित पदवी सोवत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी घेता येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापनेपासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. त्यातून अनेक विद्यार्थी प्रशासकीय व खाजगी संवेत उच्चपदावर कार्यरत आहेत. मानाची पदे भूषवत आहेत. हे विद्यापीठ सर्वसामान्य ते विशेष पारंगत अशा सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार ठरत आलेले आहे. येथे विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख तसेच वेब रेडिओ, दृकश्राव्य माध्यम व मोबाईलद्वारे देखील मार्गदर्शन केले जाते. दोनवेळा आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित, दूरशिक्षण क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य यूजीसी मान्यताप्राप्त व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचलेले एकमेव मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठातर्फे सेनादल सैनिक, बंदीजन, कृषि सेवक, शेतमजूर आणि समाजातील इतरही घटक यांच्यासाठी विशेष शिक्षणक्रम आहेत. शिवाय ए.आय. डाटा सायन्स, सायबर क्ट ते बीए, बीकॉम, एम. ए., एम. कॉम., एम. लिब., एम. सी. ए. यासह विविध व आधुनिक कौशल्य विकासाचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रम उपलब्ध आहेत. हे सर्व शिक्षणक्रम नोकरदारांना आपली नोकरी व व्यवसायिकांना आपला व्यवसाय सांभाळून पूर्ण करता येतात. त्यामुळे संबंधित इच्छुकांना आपले राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची व सर्वार्थाने प्रगती साधण्याची संधी उपलब्ध होत आहे.

त्या अनुषंगाने दिनांक २० जानेवारी २०२६ पासून विद्यापीठाच्या ११ विद्याशाखेंतर्गत विविध ८८ शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश सुरु करण्यात आले आहेत. त्यात प्रमाणपत्र - ३२, पदविका - ३०, पदवी - ११ व पदव्युत्तर १५ शिक्षणक्रमांचा समावेश आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही फक्त ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्र्माचे शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीने भरून विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज सादर करता येईल. प्रवेशासाठीची अंतिम मुदत ही येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विहित मुदतीत विद्यापीठाच्या http://ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटला भेट द्यावी. तेथे -वाळ्ीीळेप या पर्यायावरून झ्ीेीशिलीीी येथे विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. काही तांत्रिक अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (०२५३)२२३०५८०, २२३१७१५, २२३०१०६, २२३१७१४ या विद्यार्थी मदत केंद्रावरील दूरध्वनी क्र्मांकावर किंवा ९३०७५७९८७४, ९३०७५६७१८२ अथवा ९२७२०४६७२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा आणि लवकरात लवकर प्रवेश घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे व विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले आहे.

### जांभूळमाया

अंगणी जांभूळ बहरले,
हिरवा पीतांबर ल्याले,
नखशिखांत नटून जणू,
नववधूच्या थाटात उभे टाकले.
पाचूच्या घनदाट पानांत,
मधाळ मंजिरी डोलते,
वैशाखाच्या दाहक उन्हात,
शीतलतेचे गाणे गाते.
मखमाली जांभळ्या रंगाची,
जिभेवर रसीली किमया,
पानांच्या आड दडली आहे,
निसर्गाची ही सावळी माया.
रसाळ गोडव्याचा गंध हा,
वारा सुटता दरवळतो,
तृप्त चाखता एक फळ,
मनाचा मोर थुईथुई नाचतो.
ढगांत साचली दाट निळाई,
मृगाची पावले वाजली,
तप्त धरणीच्या ओठांवर,
पावसाची तहान सजली.
जांभूळ सांडले जमिनीवर,
जणू नक्षत्रांचा सडा पडला,
वर्षाऋतूच्या स्वागताला,
निसर्ग हा जांभळमय झाला!

**- राहूल इंगळे पाटील**

**हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रम**

## लातूर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जागविला गौरवशाली इतिहास




**लातूर प्रतिनिधी:** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचे औचित्य साधून लातूर जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही जिल्हास्तरीय स्पर्धा आज लातूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा गौरवशाली इतिहास जागविला. तसेच त्यांच्या मानवतावादी कार्याचे विविध पैलू प्रभावीपणे मांडले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार आणि शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती व शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेला माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, स्पर्धेचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेक सौताडेकर, परीक्षक डॉ. मकरंद गिरी, दत्ता ओव्हाळ आणि डॉ. उमाकांत चलवदे उपस्थित होते.

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास विद्यार्थी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी लातूर जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत सर्व तालुक्यांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या इतिहासावर आधारित वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक तालुकास्तरीय स्पर्धांमधून पहिल्या तीन क्रमांकांच्या स्पर्धकांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली होती. उपस्थित स्पर्धकांनी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांची जीवनगाथा प्रभावीपणे मांडली. या विद्यार्थ्यांमधून निवड झालेल्या प्रथम पाच विद्यार्थ्यांची नावे छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त स्तरावर पाठविण्यात आली आहेत.


**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**



शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रस्ता सुरक्षा अभियान निमित्त धाराशिव येथे चालकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीर

धाराशिव (जिमाका)- : रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे मे/अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व वाहन चालकांसाठी तसेच विविध कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. हर्षल डाके यांनी उपस्थित उमेदवार व नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की,केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.या अभियानांतर्गत अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये वाहन चालकांसाठी नेत्र तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येते.सर्व संघटनांनी व वाहन चालकांनी या नेत्र तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या शिबिरामध्ये मे/अजमेरा रोटरी नेत्र रुग्णालय,धाराशिव येथील नेत्र सहाय्यक श्री.शिवरूद्र इसाके तसेच जिल्हा रुग्णालयातील लॅब असिस्टंट श्री.एस.बी.शिंदे यांनी एकूण ३४ वाहन चालकांची नेत्र तपासणी केली.

सदर शिबीर सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.प्रशांतराव साळी यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक श्री.स्वप्निल पालवे,श्री. संदीप शिंदे,श्री.वैभव माळी,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.कुणाल होले,श्री.सुजित वाघमारे,कार्यालय अधीक्षक श्री.डी.के. लोंढे,श्री.नरसिंह कुलकर्णी,वरिष्ठ लिपीक श्री.ए.आर. राऊत,कनिष्ठ लिपीक श्री.बालाजी वाघमारे,श्री.रोहन साखरे,श्री.रमेश क-हाले,श्रीमती संध्या राणी गवाड तसेच शिपाई श्री.दत्तू सरपे,श्री.काळे आदी उपस्थित होते.

शिबीर कार्यक्रमामध्ये ३४ वाहन चालकांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक स्वप्निल पालवे यांनी केले,तर आभार प्रदर्शन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.कुणाल होले यांनी मानले.

# काम हाच धर्म, विकास हाच अजेंडा! धाराशिव जिल्हा परिषदेसाठी अर्चनाताई पाटील दोन गटांतून रणसंग्रामास सज्ज



धाराशिव( रामेश्वर डोंगरे) जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणांगणात अर्चनाताई पाटील यांनी गट तेर व केशेगाव या दोन गटांतून उमेदवारी दाखल करून विकासाच्या लढ्याला नवी धार दिली आहे. स्वतःचे भविष्य आजमावताना त्यांनी केलेल्या ठोस कामगिरीचा विश्वासच त्यांच्या पाठीशी उभा आहे.

जिल्हा परिषदेसाठी अर्चनाताई पाटील यांनी आतापर्यंत केलेले काम मोलाचे आणि दिशादर्शक ठरले आहे. विविध सरकारी योजनांवर स्वतः जातीने लक्ष घालून, सर्व गट व सर्व तालुक्यांत विकासकामे पूर्ण करण्याचा त्यांचा ध्यास स्पष्ट दिसतो. हातात घेतलेले काम अर्धवट न ठेवता पूर्णत्वास नेणे-हा त्यांचा स्वभावच आहे. शांत बसणे त्यांना मान्य नाही; कामच त्यांची ओळख आहे.

तेर गटासाठी आत्तापर्यंत किमान ३० कोटी रुपयांचा निधी आणून त्यांनी पायाभूत सुविधा, नागरी सोयी आणि लोकहिताची अनेक कामे पूर्ण केली आहेत. केशेगाव गटातही नागरिकांच्या गरजांना प्राधान्य देत पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व मूलभूत सुविधांसाठी भरीव योगदान दिले आहे.

२४ तास काम करण्याची ऊर्जा, न थकणारी वृत्ती आणि विकास आधी हा स्पष्ट अजेंडा-यामुळे अर्चनाताई पाटील जिल्ह्यासाठी रात्रंदिवस झटताना दिसतात. त्यांचे राजकारण तटागटात अडकलेले नाही; ते थेट तळागाळातील नागरिकांसाठी आहे. सामाजिक बांधिलकी आणि लोकहिताचे कार्य हेच त्यांच्या राजकारणाचे केंद्रबिंदू आहे.

याच विश्वासावर दोन्ही गटांतील मतदारांनी त्यांना भक्कम पाठिंबा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ही निवडणूक सत्तेसाठी नाही, तर सुधारणांसाठी असल्याचा ठाम संदेश देत अर्चनाताई पाटील विकासाच्या या लढ्यात निर्धाराने पुढे सरसावल्या आहेत.

# राज्य क्रीडा दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान

धाराशिव, (जिमाका) -: १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन म्हणून राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

दिवंगत ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांनी हेलसिंकी येथे १९५२ साली झालेल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत कुस्ती या वैयक्तिक क्रीडा प्रकारात कांस्यपदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्यांच्या या आंतरराष्ट्रीय कामगिरीमुळे राज्याचा बहुमान वाढला असून नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळावी,या उद्देशाने खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

राज्य क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच विविध क्रीडा संघटना व संस्थांच्या वतीने जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्केटींग,कराटे,मैदानी खेळ, कुस्ती,तायक्कांदो,फुटबॉल,खो-खो, बुद्धीबळ,बॅडमिंटन,नेटबॉल, डॉजबॉल आदी क्रीडा स्पर्धांचा समावेश होता.या कार्यक्रमाची सुरुवात ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर तालुका क्रीडा अधिकारी श्री. भैरवनाथ नाईकवाडी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी श्री.संतोष नलावडे,गटविकास अधिकारी,पंचायत समिती,धाराशिव यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचा कोणताही एक खेळ निवडून त्यामध्ये सातत्य ठेवल्यास यश निश्चित मिळते,असा मोलाचा संदेश उपस्थित खेळाडूंना दिला.

या कार्यक्रमांतर्गत श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिव येथे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान सोहळा पार पडला.या सोहळ्यात श्री.संतोष नलावडे, गटविकास अधिकारी,पंचायत समिती,धाराशिव,श्री. दत्तात्रय लांडगे, उपशिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद, धाराशिव,श्री.भैरवनाथ नाईकवाडी, तालुका क्रीडा अधिकारी,श्री.विश्वास खंदारे,क्रीडा मार्गदर्शक तसेच विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी यांच्या हस्ते खेळाडूंना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी स्केटींग संघटनेचे प्रविण गडदे,ॲथलेटिक्स संघटनेचे योगेश थोरबोले,फुटबॉल संघटनेचे जावेद शेख,कुस्ती संघटनेचे मनोज जाचवर, ज्युदो संघटनेचे कैलास लांडगे, तायक्कांदो संघटनेचे महाजन तसेच विविध पालक व क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.अंजिक्य वराळे यांनी केले,आभार श्री.विश्वास खंदारे,क्रीडा मार्गदर्शक यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालयातील जान्हवी पेठे, किशोर भोकरे, सुरेश कळमकर व व्यंकटेश दंडे यांनी परिश्रम घेतले.

# अनुसूचित जाती-जमाती योजनांच्या आढाव्यासाठी आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे जिल्ह्यात

धाराशिव (जिमाका)- राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे हे २० ते २१ जानेवारी २०२६ या दोन दिवसाच्या कालावधीसाठी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.या दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तसेच आर्थिक दुर्बल घटकांवरील खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

दि.१९ जानेवारी रोजी पुणे येथून सायंकाळी बायरोडने धाराशिवकडे रवाना होऊन शासकीय विश्रामगृह, धाराशिव येथे आगमन व मुक्काम करतील.

२० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुख्याधिकारी,धाराशिव नगरपरिषद यांच्या समवेत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तसेच आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी करण्यात येणार आहे.लाड पागे,दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना,घरकुल योजना,अनुदानाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे.

यानंतर सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, धाराशिव यांच्या समवेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व खर्चाचा आढावा घेऊन चर्चा करण्यात येणार आहे.दुपारी १२.३० वाजता मुख्याधिकारी,उमरगा नगरपरिषद यांच्या समवेत वरीलप्रमाणेच योजनांचा, खर्चाचा व मागील पाच वर्षांच्या कामाचा आढावा व तपासणी करण्यात येणार आहे.दुपारी २ वाजता मुख्याधिकारी, लोहारा नगरपरिषद,दुपारी ३.३० वाजता मुख्याधिकारी,कळंब नगरपरिषद आणि सायंकाळी ५ वाजता मुख्याधिकारी, तुळजापूर नगरपरिषद यांच्या समवेत अनुक्रमे बैठका घेऊन योजनांची अंमलबजावणी,निधी वितरण,कामांची गुणवत्ता तसेच सफाई कर्मचारी संदर्भातील बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.सायंकाळी शासकीय विश्रामगृह, धाराशिव येथे मुक्काम करतील.

२२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुख्याधिकारी,परंडा नगरपरिषद यांच्या समवेत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा,आर्थिक दुर्बल घटकांवरील खर्चाचा,मागील पाच वर्षांच्या कामाचा आढावा व तपासणी करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती-जमातींसाठी असलेल्या विविध योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.

दुपारी १२.३० वाजता मुख्याधिकारी भूम नगरपरिषद यांच्या समवेत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा तसेच कामाची तपासणी करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी करण्यात येणार आहे.लाड पागे योजना,दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना,घरकुल योजना,अनुकंपाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचारी इत्यादी बाबींवर आढावा व चर्चा करण्यात येणार आहे.

दुपारी २ वाजता मुख्याधिकारी,वाशी नगरपरिषद यांच्या समवेत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा तसेच कामाची तपासणी करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी करण्यात येणार आहे.लाड पागे योजना,दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना,घरकुल योजना,अनुकंपाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचारी इत्यादी बाबींवर आढावा व चर्चा करण्यात येणार आहे.

दुपारी ३.३० वाजता मुख्याधिकारी,मुरुम नगरपरिषद यांच्या समवेत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा तसेच कामाची तपासणी करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी करण्यात येणार आहे.लाड पागे योजना, दलित वस्ती,अण्णाभाऊ साठे सुधार योजना, घरकुल योजना,अनुकंपाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचारी व इतर बाबींवर आढावा घेण्यात येणार आहे.

सायंकाळी ५ वाजता जिल्हा समाजकल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, धाराशिव यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा बैठक व चर्चा करण्यात येणार आहे.

# तुळजापूर मंदीराजवळील पार्कींग येथुन मोबाईलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राहुल चंद्रकांत नाटेकर, वय २८ वर्षे, रा. पंचनदी ता. दापोली जि. रत्नागिरी यांचा वन प्लस १५ आर कंपनीचा मोबाईल अंदाजे ५२,९९९ किंमतीचा हा दि.१०.०१.२०२६ रोजी ०१.०० ते ०६.०० वा. सु. तुळजापूर मंदीराजवळील पार्कींग येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राहुल नाटेकर यांनी दि.१९.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# खुदावाडी पंचायत समिती गणातून किशोर धुमाळ यांचा उमेदवारी अर्ज दाखल



तुळजापूर (विजय पिसे)- तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गट अंतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातून वागदरी तालुका तुळजापूर येथील किशोर पांडुरंग धुमाळ उर्फ कुशाबा यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

किशोर धुमाळ हे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांनी तुळजापूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार राणा दादा यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे कार्य निष्ठेने करतात.भारतीय जनता पक्षाने राबविलेल्या विविध उपक्रमामध्ये ते सक्रिय असतात त्यांनी पक्षाची सदस्य नोंदणी अभियानामध्ये अडीचशे हुन अधिक सदस्यांची नोंदणी केली आहे. वेळोवेळी होणाऱ्या पक्षाच्या बैठका,कार्यक्रम यामध्ये ते सक्रीय असतात.आपल्या परिसरातील गोरगरीब जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या आमदार राणा दादा पाटील यांच्या पर्यंत पोहोचून त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात. गावोगावी त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे.ते प्रत्यक्ष सामान्य जनतेपर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतात.त्यामुळे जनमानसात त्यांची एक चांगली प्रतिमा आहे.

भाजपा नंदगाव जि. प. गटप्रमुख तथा तुळजापूर मार्केट कमिटीचे सदस्य सिद्धू अण्णा कोरे,भिवाजी इंगोले, विवेकानंद मेलगीरी,महादेव सालगे,अंगद जाधव आधी जेष्ठ कार्यकर्त्यांच्या समवेत पक्ष बांधणीचे काम प्रामाणिकपणे करतात त्यामुळे एकूणच त्यांच्या कार्याचा विचार करून पक्षश्रेष्ठीने किशोर धुमाळ यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी होत आहे. याबाबत किशोर धुमाळ यांना विचारले असता ते म्हणाले की माझ्यासाठी पक्षश्रेष्ठीचा निर्णय हा अंतिम असून पक्षश्रेष्ठी जो निर्णय देईल तो मान्य करून भाजपा बरोबरच एकनिष्ठ राहणार असे ते म्हणाले.

# दहावी-बारावीनंतर करिअरची योग्य दिशा : तुळजापूर येथे मानसशास्त्रीय कलचाचणी व समुपदेशन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

धाराशिव (जिमाका) -दहावी व बारावीनंतर योग्य करिअरची निवड कशी करावी, मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे भविष्यातील करिअरविषयक निर्णय कसे घ्यावेत,या उद्देशाने श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,तुळजापूर येथे १६ जानेवारी २०२६ रोजी मानसशास्त्रीय कलचाचणी व करिअर समुपदेशन कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली.सुमारे तीन तास चाललेल्या या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांची जागतिकस्तरावर वापरली जाणारी इंटरेस्ट प्रोफाईलर गझ ही मानसशास्त्रीय कलचाचणी घेण्यात आली.

या चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतातील एकूण ५२ प्रमुख करिअर क्षेत्रांमधील उपलब्ध असलेल्या शेकडो जॉब रोल्सपैकी आपल्या आवडीनिवडी,क्षमता व कौशल्यांशी सुसंगत जॉब रोल निवडण्यास मदत होणार आहे.ही चाचणी जागतिक स्तरावर कार्यस्थळावरील मूल्ये (वर्किंग व्हॅल्यूज) ओळखण्यासाठी वापरली जाते.या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू,कार्यमूल्ये तसेच त्यानुसार योग्य करिअर पथ निवडण्याबाबत स्पष्टता मिळाली.

या मानसशास्त्रीय कलचाचणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्व-ओळख निर्माण होऊन भविष्यातील करिअरविषयक निर्णय वैज्ञानिक दृष्टिकोनातून घेण्यास मदत झाली. श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सुमारे ८९ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रम व रोजगार मंत्रालयाचे समुपदेशक श्री.दत्तात्रय सुभाष कांबळे,मॉडेल करिअर सेंटर,लातूर यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा कौशल्य विकास विभागाच्या उपायुक्त श्रीमती विद्या शितोळे,सहाय्यक आयुक्त श्री.संजय गुरव तसेच श्री.दत्ता चव्हाण (परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी सहाय्यक आयुक्त,धाराशिव) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.

या उपक्रमासाठी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री.वैजनाथ घोडके,शिक्षकवृंद व कर्मचारी तसेच जिल्हा कौशल्य विकास कार्यालय, धाराशिव येथील श्री.बाबासाहेब शेटे व श्रीमती विद्या नाडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649